महाराष्ट्र वन विभाग

सत्यमेव जयते

**उपवनसंरक्षक, कार्यालय**
**अमरावती वनविभाग,**
**अमरावती**
**कॅम्प अमरावती ४४४ ६०२**

दूरध्वनी क्रमांक०७२१-२६६२८१४,(वैय) २५५०१४४
ई-मेल dycfamravati@mahaforest.gov.in,dcfamtdn१४@gmail.com

**क्रमांक :-** सर्व्हे /व.सं.अ.१९८०/949 /२०२१-२२
**अमरावती, दिनांक** 4-10-2021

**प्रति,**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशीक),**
अमरावती वनवृत्त अमरावती,
**अमरावती.**

**विषय :-** नांदगाव पेठ ते वरुड - पांढुर्णा राज्य महामार्गाचे रुंदि -करणामध्ये बाधित होत असलेल्या वनविभागाच्या १४.९७९ हे. जमीनी बाबत वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव.

**संदर्भ :-** आपले कार्यालयीन पत्र क्रमांक कक्ष-४/जमीन/प्रस्ताव/प्रक्र८३४(१)/९६३/२१-२२,दि.२०.०७.२०२१.

**-०-०-०-०-०-**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, अमरावती वनविभाग, अमरावती या विभागाचे कार्यक्षेत्रातील, अमरावती, मोर्शी व वरुड परिक्षेत्राअंतर्गत अस्तित्वात असलेल्या रस्त्याचे नुतनीकरण तथा दर्जावाढ करणे करीता नांदगाव पेठ ते करवार नाका पर्यंत वनजमीन मागणीचा वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्तावामध्ये संदर्भिय पत्रान्वये काढण्यात आलेल्या त्रुटिंची पुर्तता करून सद्य:स्थिती दर्शक अहवाल मुद्या क्र.०१ ते १० यासोबत सादर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | Itemwise breakup of forest & non forest land बाबत विहीत नमुन्यात सर्वे क्रमांक निहाय, गट निहाय व कंम्पार्टमेंट निहाय तपशील सादर केलेला नाही तसेच वनक्षेत्राबाबत Legal Status नमुद केले नाही. वळतीकरण क्षेत्रासंबंधी गावांचे नाव व गट क्रमांक ७/१२ उतारा नुसार एकसारखे संपुर्ण प्रस्तावात नमुद करावे. | त्रुटिची पुर्तता करण्यात आलेली असुन, सदर प्रकल्पात बाधीत होणाऱ्या वनक्षेत्राचा व वनेत्तर क्षेत्राचा तपशील सोबत जोडलेला आहे. **(Annexure I)** |
| २ | उपवनसंरक्षक, अमरावती यांनी सादर केलेल्या नक्त वर्तमान मुल्याच्या (N.P.V.) प्रमाणपत्रात Eco Value Class III Tropical Dry Deciduous Forest has the density less than ०.४ नमुद केली आहे. तसेच प्रकल्प यंत्रणेनी रु. १२०२८१३७/- एवढी रक्कम भरणा करावयाचे प्रस्तावीत आहे. N.P.V चा भरणा केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचना क्र.एफक्र.५-३/२००७/एफ | नक्त वर्तमान मुल्याच्या (N.P.V.) प्रमाणपत्रात Eco Value Class III Tropical Dry Deciduous Forest has the density ०.४. बाधित होणाऱ्या वृक्षांची संख्या व वृक्षांची प्रतवारी लक्षात घेऊन नमुद केली आहे. तसेच प्रकल्प यंत्रणे कडून ८.०३ लक्ष प्रति हेक्टर प्रमाणे रु. १२०२८१३७/- एवढी रक्कम भरणा करावयाचे प्रस्तावीत आहे. N.P.V चा भरणा केंद्रशासनाचे मार्गदर्शक सुचना क्र.एफक्र.५-३/२००७/ एफसी, दिनांक ०५/०२/२००९ अन्वये विहित केलेल्या दराप्रमाणेच घेण्यात आलेला आहे. सोबत प्रमाणपत्राची प्रत जोडण्यात येत आहे. **(Annexure II)** |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | सी दिनांक ०५/०२/२००९ अन्वये विहित केलेल्या दराप्रमाणे राहील याची सुनिश्चीती करावी. | |
| ३ | वनक्षेत्रात व वनक्षेत्राबाहेर बाधित होणाऱ्या वृक्षांची संख्या तसेच तोड झालेल्या व तोड न झालेल्या वृक्षांचा वेढी निहाय तपशील सादर करावे तसेच ऑनलाईन फॉर्म - II मध्ये वृक्षतोडी संख्या अचुक नोंदविण्यात यावे. तोड न झालेल्या वृक्षांसाठीचे अंदाजपत्रक सादर करावे. | सदर प्रकल्पामध्ये एकुण २६८८ वृक्ष बाधित होत आहेत. त्यापैकी वनक्षेत्रातील १४९६ (वरुड वनपरिक्षेत्र १४७४, मोर्शी वनपरिक्षेत्र २२) व वनक्षेत्रा बाहेरील ११९२ वृक्ष बाधित होत आहेत. वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशीक) वरुड यांनी जारी केलेल्या प्रगुरि. क्रमांक ५/८ व १४/१ दिनांक ०५/०३/२०१८ व १६/०१/२०१८ नुसार ३२२ वृक्षांची तोड करण्यात आलेली आहे. ११७४ (वरुड -११५२ + मोर्शी २२) वृक्षांची तोड करणे बाकी आहे.<br><br>या व्यतिरीक्त वनेत्तर क्षेत्रातील एकुण ११९२ वृक्षांपैकी ११९० वृक्षांचे तोडीकरीता उपविभागीय अधिकारी, मोर्शी यांचे पत्र क्रमांक टी आर एस - १६/ जरुड /०३, दिनांक १५/०९/२०१७ अन्वये वृक्षतोडीची परवानगी यंत्रणेस दिली आहे.<br><br>सोबत दिलेल्या Annexure III मध्ये मोर्शी परिक्षेत्रातील ३८ वृक्ष तोडकरणे प्रस्तावीत असल्याचे दिसुन येते, परंतु या पैकी मौजा येरला येथिल २४ वृक्षांपैकी १६६ सें.मी. गोलाई चे वर असलेले ०८ वृक्ष तोडण्यात येणार आहेत.त्यामुळे जोडलेल्या ३८ वृक्षांच्या यादी ऐवजी २२ वृक्ष प्रत्यक्षात तोडण्यात येणार आहेत. **(Annexure III)** |
| ४ | वनक्षेत्रात तोड झालेल्या वृक्षांची वाहतुक शासकीय आगारावर झाली काय? झाली असेल तर त्यांची विक्री झाली काय? याबाबत सविस्तर तपशील सादर करावे. | वनक्षेत्रामध्ये तोड करण्यात आलेल्या वृक्षांची वाहतुक अमरावती वनविभागामार्फत शासकीय आगारावर करण्यात आलेली आहे. सदर मालाची विक्री करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.<br><br>**<u>विक्रीसाठी आणलेला माल.</u>**<br>१. सागवान ईमारती माल - ५९.२३२ घ.मी.<br>२. सागवान रचित माल - १८.००० घ.मी.<br>३. आडजात माल - ३२.९२१ घ.मी.<br>**<u>एकुण - ११०.१५३</u>**<br>**<u>विक्री झालेला माल.</u>**<br>४. सागवान ईमारती माल - ५९.२३२ घ.मी.<br>५. सागवान रचित माल - १८.००० घ.मी.<br>६. आडजात माल - ३२.९२१ घ.मी.<br>**<u>एकुण - ११०.१५३</u>**<br><br>वरिल प्रमाणे विक्री झालेल्या मालापासुन प्राप्त झालेली रक्कम. २५,४६,३००/- (रुपये पंचविस लाख छेचाळीस हजार तिनशे रूपये फक्त) |
| ५ | गांवाचे नकाशात वळती होणारे वनक्षेत्र स्पष्टपणे दर्शवीने. प्रत्येक नकाशांवर title नमुद करावे. | गांवाचे नकाशात वळती होणारे वनक्षेत्र स्पष्टपणे दर्शविण्यात आलेले असून नकाशावर title नमुद करण्यात आले आहे. व त्रुटिची पुर्तता करण्यात आलेली आहे. **(Annexure-IV)** |
| ६ | तत्कालीन वनक्षेत्रपाल वरूड यांचे विरुध्द सुरू झालेल्या शिस्तभंग विषयक कार्यवाही बाबत अद्यावत स्थिती सादर करावी. | मोर्शी ते महाराष्ट्र /मध्यप्रदेश सिमा NHK-३५३K रस्त्यामध्ये बाधीत वनक्षेत्रात अवैध वृक्षतोड, अवैध खोदकाम व झालेल्या वनभंगात दोषी आढळुन आल्याने त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु केली आहे. श्री.दादाराव श्रीरामजी काळे, यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्याय प्राधिकरण मुंबई खंडपीठ, नागपुर येथे मुळ अर्ज क्र.४००/२०१८ दाखल केला होता त्यावर मा.महाराष्ट्र प्रशासकीय |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | न्याय प्राधिकरण मुंबई खंडपीठ, नागपुर यांनी दिनांक २७.०८.२०१९ रोजी न्यायनिवाडा देऊन वनविभागाचे बाजुने निर्णय दिलेला आहे. सदर निर्णयाच्या विरुध्द श्री.दादाराव श्रीरामजी काळे, यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्याय प्राधिकरण मुंबई खंडपीठ, नागपुर येथे रिव्हीव (पुनर्विचार याचिका क्र.३०/२०१९) दाखल केलेली असुन, यावर या विभागामार्फत दिनांक २८.११.२०१९ रोजी परिच्छेद निहाय उत्तर तसेच प्रतिज्ञापत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. |
| ७ | कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोला यांचे विरुध्द नोंदविण्यात आलेल्या वनगुन्ह्याची अद्यावत स्थिती. सदर गुन्हा तार्कीक निकषापर्यंत (logical conclusion) आणण्यासाठी झालेली कार्यवाही चा तपशील सादर करावा. | सदरचे प्रकरण वनभंगाचे असल्यामुळे केंद्र शासनाचे दिनांक २९.०१.२०१८ चे मार्गदर्शक सुचनेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे. सदर प्रकरणी मार्गशेक सुचनेतील परिच्छेद ३(B) अंतर्गत मोडत असल्यामुळे त्यामधील दिलेल्या सुचनेनुसार खालील प्रमाणे कार्यवाही सुरु आहे.<br><br>i) सदर प्रकल्पात १.३१२ हेक्टर एवढ्या वनक्षेत्रात उत्खनन झालेले आहे. तसेच ३२२ झाडांची तोड झालेली आहे. सदर झालेल्या वनभंगाचे अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेस या कार्यालयाचे पत्र क्र.सर्व्हे/ वन.अधि/ १९८०/ प्रस्ताव/ १९३२ दिनांक २३.०२.२०१९ अन्वये वनभंग झालेल्या १.३१२ हेक्टर क्षेत्राचे बदल्यात दंडात्मक रक्कम रु.१०६०७६३/- CAMPA कडे भरणा करणे बाबत कळविण्यात आले आहे.<br><br>ii) सदर प्रकरणामध्ये मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा) अमरावती वनवृत्त, यांचे पत्र क्रमांक कक्ष-४/ जमीन प्र.क्र.५१०/(१) ४९८२, दिनांक २०.०२.२०१९ अन्वये मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अमरावती यांना वनभंगास जबाबदार असणाऱ्या श्री.एस.बी. झाल्टे, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग यांचे विरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्याकरीता कळविण्यात आले आहे. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी, वरुड यांचे मार्फत चौकशी सुरु असुन, संबंधीत अधिकारी यांना दोन वेळा चौकशी करीता विभागीय कार्यालयामध्ये पाचारण करण्यात आले होते. त्यांचेकडून वनभंगाबाबत संपूर्ण चौकशी / तपासणी करण्यात आलेली आहे.<br><br>iii) तसेच ३२२ झाडांची तोड करणे व अवैध उत्खनन केल्यामुळे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग यांचे विरुध्द वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.सदर प्रकरण क्रमांक ६३/१९ दिनांक २८.०३.२०१९ अन्वये न्यायप्रविष्ठ करण्यात आलेले आहे. |
| ८ | प्रस्तावातील पृष्ठ क्र. ६३ वर उल्लेखीत वनगुन्हा प्रकरणाची सद्यस्थिती व त्यांना तार्कीक निकषापर्यंत (logical conclusion) आणण्यासाठी केलेली कार्यवाही बाबत स्पष्ट करावे. | वरील प्रमाणे मुद्या क्रमांक ७ मध्ये नमुद केल्यानुसार. |
| ९ | सदर प्रस्तावात केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचना दिनांक २९.०१.२०१८ च्या परिच्छेद ३- | सदर प्रस्तावात केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचना दिनांक |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | FCA Act is under consideration and forest land is diverted before grant of FC" या मथळाखली मांडत असल्याचे दिसून येते. सबब त्या परिच्छेदातील दिलेल्या मार्गदर्शक सुचना प्रमाणे तत्परतेने कार्यवाही करून त्याचा अंतर्भाव violation report मध्ये स्पष्ट करावे व अहवाल आंग्ल भाषेत सादर करावा. | सर्व्हे / व.सं. अधि १९८०/ प्रस्ताव /१९३२, दि २३.०२.१९. अन्वये वनभंग झालेल्या १.३१२ हेक्टर क्षेत्राचे बदल्यात दंडात्मक रक्कम रुपये १०६०७६३/- CAMPA कडे भरणा करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. |
| १० | पर्यायी वनिकरणासाठी निवडलेल्या क्षेत्राचे अचुक कंपार्टमेंट क्रमांक, सर्व्हे क्रमांक, गट क्रमांक संबंधित दस्तऐवजावर एकसारखी नमुद करावी. | (see table below) वरिल प्रमाणे माहिती नमुद करण्यात येत आहे. |

| Village Name | Old Comptt No | New Comptt No | Sur No | Area in Ha. |
|---|---|---|---|---|
| Talni | ४४८ | ५३७ | १०१ | ८.७६१ |
| Talni | ४४९ | ५३८ | १०३ | ५.३१२ |
| Talni | ४५० | ५३९ | ११३ | ७.१३३ |
| Talni | ४५१ | ५४० | ११५ | १.६१९ |
| Talni | ४५२ | ५४१ | ११८ | ३.२२७ |
| Talni | ४५३ | ५४२ | १२५ | १०.३४ |

वरिल प्रमाणे माहिती नमुद करण्यात येत आहे.

प्रकल्प यंत्रणेने सदर प्रकल्पात वनभंग झालेल्या १.३१२ हेक्टर क्षेत्राचे बदल्यात दंडात्मक रक्कम रुपये १०,६०,७६३/- अद्याप CAMPA कडे भरणा केलेली नाही.

करीता वरिल प्रमाणे अहवाल सहपत्रासह माहितीस तथा पुढील कार्यवाहीस सविनय सादर.

(signature) ५/०७/२१

(चंद्रसेकरन बाला)
उपवनसंरक्षक,
अमरावती वन विभाग, **अमरावती.**

(initials) ३/७/२१

प्रतिलीपी :- कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, ~~अकोला~~ अमरावती. यांना माहिती करीता सस्नेह अग्रेषीत.



Scanned with CamScanner